नियमित फौजदारी खटला नं.७०४/२०२२
निशाणी- २६

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ चा जबाब.

मी शपथेवर कथन करतो की,
माझे नांवः- विशाल गौतम ठाकुर
वयः- २८वर्षे, धंदाः- व्यवसाय
राहणारः- जुना बाजार माळीवाडा, अहमदनगर

सरतपास अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती सीमा शेख यांचेकडूनः-

१. मी दि. ११/०४/२०२२ रोजी मी मित्र महेश चिंतामणी याचे सोबत एस. पी. कार्यालयात गेलो होतो. तेथे पोलीसांनी माझी सही घेतली. याव्यतिरिक्त माझ्या समक्ष काही झाले नाही. असे काही झाले नाही की, माझ्या समक्ष पंचनामा केला. मला दाखविण्यात आलेल्या पंचनाम्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहित नाही. सहीस नि. २७ देण्यात येते. सरकारी वकिलांनी साक्षीदाराला गुन्हयातील जप्त मोबाईल दाखविण्याची परवानगी मागितली. त्याकरिता सिलबंद लिफाफा उघडण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली. सदर लिफाफा उघडला असता त्यामध्ये एक सिलबंद लिफाफा आढळुन आला. त्या सिलबंद लिफाफ्यामध्ये oppo कंपनीचा निळया रंगाचा मोबाईल आहे. सदर लिफाफ्यावर अ. क्र. २ वर माझी सही आहे. सदर सहीस नि. २८ देण्यात येते.

(साक्षीदार सरकार पक्षाला सहाय्य करीत नसल्यामुळे सरकार पक्षाच्या विनंतीवरुन साक्षीदारास उलटतपासणीची परवानगी देण्यात आली.)

**उलटतपास अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती सीमा शेख यांचे मार्फतः-**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. ११/०४/२०२२ रोजी मला सायबर पोलीस स्टेशन येथे पंचनामा करण्याकामी बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी तेथे इशा जाधव हजर होत्या व गुन्हयाच्या तपासाकामी पोलीस स्टेशनमध्ये सदर गुन्हयात वापरलेला मोबाईल त्यांनी हजर केला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर मोबाईल माझ्या समक्ष जप्त करण्यात आला व त्याबाबत जप्ती पंचनामा तयार करण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, सदर मोबाईल oppo कंपनीचा व निळया रंगाचा होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर माझी त्यावर सही घेण्यात आली. हे म्हणणे खरे नाही की, सदर पंचनामा वाचुन मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

<u>उलट तपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. आर. आर. गायकवाड यांचेकडूनः</u>-

उलटतपास नाकारला.

फेरतपास पूर्ण.

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN

Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.01.12 14:46:04 +0530

(एल.एस.पाढेण)

दि.१२/०१/२०२६

मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.